# प्रारुप

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

### जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी,गोंदिया

राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कोरोना विषाणु (कोविड-१९) प्रादुर्भाव लक्षात घेता उद्रेक सदृश्य परिस्थीती हाताळण्यासाठी तसेच Epidemic Act १८९७ अधिकारा अंतर्गत खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी व करारपध्दतीने कोविड संपेपर्यंतचे कालावधी करीता मानधन तत्वावर खालील पदाकरीता विहीत अर्हता पात्र उमेदवारांची पदभरती करावयाची आहे. त्याकरीता खालील पदाकरीता ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे.

| Sr.No. | Name of Post | No. of Post | Qualification | Total Honorium Per Month |
|---|---|---|---|---|
| 1 | Physician | 5 | MD (Medicine) | 75,000/- |
| 2 | Anesthetist | 2 | MD (Anesth) | 75,000/- |
| 3 | Medical Officer | 10 | M.B.B.S. | 60,000/- |
| 4 | Medical Officer | 16 | B.A.M.S. | 28,000/- |
| 5 | Staff Nurse | 25 | GNM<br>B.Sc. Nursing | 20,000/- |
| 6 | X-ray Technician | 5 | Retired X-ray Technician | 17,000/- |
| 7 | ECG Technician | 3 | Experience of ECG Technician at least 1 year | 17,000/- |
| 8 | Hospital Manager | 6 | Any Medical Graduate with one year experience of hospital administration | 35,000/- |

**<u>सर्वसाधारण अटी व शर्ती</u>**

१) फक्त Online पध्दतीनेच अर्ज स्वीकारण्यात येतील. Online पध्दतीने अर्ज भरणेकरीता www.zpgondia.gov.in या सकेंतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

२) सदर अर्ज भरणेकरीता उमेदवाराने स्वत:चा Gmail Account तयार करुन घेणे आवश्यक राहील.

३) Online अर्ज भरण्याचा कालावधी दि.06/08/2021 (सकाळी १०.३० वाजता पासून ते 10/08/2021 (रात्री १२.०० वाजेपर्यंत) राहील.

४) प्राप्त अर्जाची यादी प्रकाशीत करणे (गुणाकंणासह) दि.12/08/2021 सकाळी ११.०० वाजता.

५) आक्षेप मागविण्याचा कालावधी दिनांक 14/08/2021 रात्री १२.०० वाजे पर्यंत.

६) आक्षेप निराकरण करण्याकरिताचा कालावधी दिनांक ..15/08/2021.

७) अंतीम यादी प्रकाशीत करण्याचा दिनांक 16/08/2021

८) गरजेपक्षा जास्त उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यास मेरीट लीस्ट नुसार १:३ उमेदवारांना कागदपत्र पडताळणी करीता बोलाविण्यासाठी पदनिहाय वेळापत्रक वेबसाईटवर नंतर प्रकाशीत करण्यात येईल. इतर उमेदवारांना विचारात घेण्यात येणार नाही तथापी प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची यादी ही जिल्हा परिषद च्या संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात येईल.

९) पदनिहाय १:३ उमेदवारांच्या अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राची पडताळणी केल्यानंतर अंतिम निवड यादी प्रकाशीत करण्यात येईल.

१०) अंतिम निवड यादी प्रसिध्द केल्यानंतर नियुक्ती आदेश देण्यात येईल. आवश्यकता भासल्यास मुलाखत ही मा.जिल्हाधिकारी गोंदिया यांच्या दालनात घेण्यात येईल.

११) Online प्राप्त झालेल्या अर्जावरुन व उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेवरुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. मेरीट लिस्ट तयार करतांना Qualifying Exam मध्ये मिळालेले गुण + उच्च शैक्षणिक अर्हता + शासकीय/निमशासकीय कार्यालयाचा अनुभव याबाबींचे गुण एकत्र करुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येऊन सदर मेरीट लीस्ट ही जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर प्रकाशीत करण्यात येईल व संबंधीत पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यात येईल. MBBS/BAMS व इतर अर्हताधारक उमेदवारांसाठी Attempt Certificate अनिवार्य आहे.

१२) वरील नमुद सर्व पदे हि राज्य शासनाची पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर कायम पणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही.

१३) वरील सर्व पदांचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

१४) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत वैदयकिय अधिकारी (MBBS), विशेषज्ञ,अतिविषेशज्ञ पदावरील उमेदवार उपलब्ध होत नसल्याने सदर पदांसाठी सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा ६१ वर्ष अशी व सेवा समाप्तीची मर्यादा ७० वर्ष राहील.

१५) अभियान अंतर्गत इतर रुग्ण सेवेशी संबंधीत पदे उदाहरण परिचारीका, अधिपरिचारीका, तंत्रज्ञ, समुपदेशक, औषध निर्माता इत्यादी पदे भरतीसाठी कमाल वयोमर्यादा ५९ वर्ष व समाप्ती वयोमर्यादा ६५ वर्ष राहील.

१६) उर्वरीत सर्व पदांसाठी सेवा प्रवेशाची (जाहिरातीच्या दिवशी) कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे तसेच राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील तसेच या पदासाठी सेवा समाप्ती मर्यादा ६० वर्षे राहील. उक्त नमुद पदावर राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरीता कमाल सेवा प्रवेश मर्यादा ५ वर्षे पर्यंत क्षिथील राहील.

१७) ६० वर्षावरील अर्जदारांकरीता जिल्हा शल्य चिकित्सक प्रमाणीत शारिरीक योग्यता (Physical Fitness) चे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. शासकीय कर्मचारी यांच्यावर पूर्वीच्या शासकीय कर्मचारी कार्यकाळात कुठल्याही स्वरुपाचे प्रशासकीय व वित्तीय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयांची नोंद नसावी.

१८) विशेष तज्ञ व वैद्यकीय अधिकारी या पदांकरीता महाराष्ट्र मेडीकल कॉन्सील मुंबई यांची अद्यायावत नोंदणी असणे आवश्यक आहे.

१९) स्टॉफ नर्स या पदांकरीता महाराष्ट्र नर्सिंग कॉन्सील ची अद्यायावत नोंदणी असणे आवश्यक आहे.

२०) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

२१) शासकिय सेवेतुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी यांना जिल्हा शल्य चिकित्सक यांचे शारीरीक व मानसीक दृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

२२) उमेदवारांस एकापेक्षा जास्त पदांकरीता अर्ज सादर करावयाचे असल्यास प्रत्येक पदांकरीता स्वतंत्र अर्ज करावा लागेल.

२३) सदर रिक्त पदांसाठी आवश्यक पात्रता असलेला अर्जदार न मिळाल्यास किंवा आवश्यक त्या संस्थेत अर्जदार न मिळाल्यास त्या पदाकरीता असलेली पात्रता (अर्हता व अनुभव) आवश्यकतेनुसार शिथील करण्यात येईल. तसेच राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेता खुल्या प्रवर्गातील प्रतिक्षा यादीतील उमेदवाराला तात्पुरती नेमणूक देण्यात येईल.

२४) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

२५) ज्या आशा स्वयंसेवीकांनी जी.एन.एम./ए.एन.एम. चा कोर्स केलेला असेल त्यांना वयाची अट राहणार नाही व त्यांना भरतीप्रक्रियेत प्राधान्य देण्यात येईल. तसेच ज्या उमेदवारांना जी.एन.एम. कोर्स करीता एनएचएम कडून शैक्षणिक कर्ज घेतले असेल अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

२६) अनुभव असलेल्या उमेदवारास निवड प्रक्रियेमध्ये प्राधान्य दिले जाईल. कामाचा अनुभव हा **आरोग्य विभागातील** शासकीय / राष्ट्रीय आरोग्य अभियान / स्थानिक स्वराज्य संस्थाचाच ग्राहय धरण्यात येईल.

२७) मा.सर्वोच्च न्यायालयाने अपिल क्रं.७७४४/१९९७ या प्रकरणी दिनांक १८/०२/२००३ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार मुळ नियुक्ती विहित मार्गाने केलेले असल्याशिवाय सेवा नियमित करता येणार नाही. तसेच लोकसेवा आयोगाचे कक्षेतील पदावर तात्पुरत्या/अस्थायी स्वरुपात नियुक्ती केलेला कोणताही कर्मचारी त्या पदावर कितीही वर्ष सेवेत राहिला तरी कायम करण्याचा हक्क सांगु शकत नाही. सदरील नियुक्त्या या अत्यंत तातडीची गरज म्हणून असून विहित वेळेनंतर संपुष्टात येईल. तसेच अशा कर्मचाऱ्यांनी त्यांना नियमित सामावुन घेण्याची मागणी केली असेल तर मान्य करता येणार नाही.

२८) विशेषतज्ञ पदांकरीता व वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता अथवा पुरेश्या प्रमाणात अर्ज प्राप्त न झाल्यास प्रत्येक महीण्यातील मंगळवारी दुपारी १२.०० वाजता थेट मुलाखात व्दारे जिल्हा शल्य चिकित्सक / मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे मुलाखती घेण्यात येतील.

२९) सदर प्रक्रियेत कोणत्याही क्षणी कोणतीही पूर्व सूचना / कारण न देता कोणत्याही टप्प्यावर बदल अथवा रद्द करण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहे. सदर करिता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

३०) मुलाखत होणार नसल्याने तसेच संपूर्ण प्रक्रिया ही Online पध्दतीने राबविण्यात येत असल्याने कोणत्याही उमेदवारांनी या कार्यालयात बोलाविल्या शिवाय प्रत्यक्ष भेट देऊ नये.

३१) भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्रांचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्व सुचना न देता रद्द करण्यात येईल.

जिल्हा शल्यचिकित्सक
के.टी.एस.,सामान्य रुग्णालय,गोदिया